प्रेस नोट दि. २४/१२/२०२१

साकीनाका पोलीस ठाणे मुंबई येथे कार्यरत असलेले स.पो.नि खंदारे यांना आज दिनांक २४/१२/२०२१ रोजी त्यांच्या गुप्त बातमीदारमार्फत माहीती मिळाली की, मैनुद्दीन चौधरी वय ३२ वर्षे या नावाचा इसम साकीनाका परीसरात कोवीड १९ चे वॅक्सीन न घेतलेल्या व्यक्तींना " सर्टीफिकेट फॉर कोवीड वॅक्सीनेशन मिनीस्ट्री ऑफ हेल्थ अॅन्ड फॅमीली वेलफेअर गर्व्हमेंट ऑफ इंडीया" या अधिकृत सर्टिफिकेटची विक्री करीत आहे. प्राप्त माहीती वरीष्ठांना देण्यात आली असता योग्य ती कारवाई करण्याचे आदेश वरीष्ठांनी दिले.

सदर माहीतीच्या अनुशंनगाने म.न.पा एल वॉर्ड येथील सहायक वैद्यकीय अधिकारी श्रीमती. लुब्ना अन्सारी व सहकारी यांच्या सह बोगस गिऱ्हाईकाच्या मार्फतीने सापळा रचुन नमुद इसमास ताब्यात घेण्यात आले. म.न.पा.एल वॉर्ड सहायक वैद्यकीय अधिकारी श्रीमती. लुब्ना अन्सारी यांच्या तक्रारीवरून साकीनाका पोलीस ठाणे गु.र.क्र. १२७९/२०२१ कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, १८८, २६९, २७०,३४ भा.दं.वि सह साथिचे रोग अधिनीयम ०२, ०३, ०४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाकडे चौकशी केली असता तो त्याचा मित्र नामे अरफान, रा.ठि. आजमगढ, उत्तरप्रदेश व तेथील स्थानीक वैद्यकीय अधिकारी यांच्या मदतीने सदरचे बनावट प्रमाणपत्र बनवुन रूपये १०००/— मध्ये विक्री करीत असल्याची माहीती मिळाली असुन सदर बाबत अधिक तपास चालु आहे. अन्य सहभागी आरोपींचा शोध घेवुन त्यांच्यावर कारवाई करित आहोत.

सदरची कारवाई ही मा. अप्पर पोलीस आयुक्त, पश्चीम प्रादेशीक विभाग, मुंबई, मा. पोलीस उप आयुक्त, परी मंडळ १०, मुंबई, मा. सहायक पोलीस आयुक्त, साकीनाका विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली व.पो.नि बळवंत देशमुख, साकीनाका पोलीस ठाणे, मुंबई, सहायक पोलीस निरीक्षक, मैत्रानंद खंदारे, पो.ना.क्र. ९७०३८८/पाटील, पो.ना.क्र. ०३११४६/पवार, पो.शि.क्र. ०६१९०४/खुंटे यांनी म.न.पा एल वॉर्ड चे सहायक वैदयकीय अधिकारी लुब्ना अन्सारी, श्री प्रतिक प्रभाकर डोईफोडे, श्री राहुल गांगुर्डे, श्री अमार पटेल यांच्या मदतीने केली.